आमचे सारे लक्ष आमच्याकडे
त्यांचे असिद्ध आत्म्याकडे!
आम्हाला सतत दैनंदिन चिंता
त्यांना मात्र अदृष्य मोक्षाच्या!

आमचे इथे बरे चालले आहे
त्यांचे? अर्थातच तसे नाही!
परमेश्वराच्या थोर प्राप्तीसाठी
त्यांचे घरी लक्षच नाही!

आम्ही इथे आनंदात आहोत
ते मुळीच तसे नाहीत!
इथले काटे बोचत असताना
त्यांना आस स्वर्गस्थ आनंदाची!

आमच्या-त्यांच्यात फरक आहे
तरीही ते आमचेच आहेत,
त्यांचे मनच इथे नसल्याने
आम्ही मात्र त्यांच्यात नाही!

१२.१.२०१९